# Iliad - इलियड

लेखक: ग्रीक कवी होमर
संक्षिप्त मराठी कथानक: प्रा. डॉ. बिंदुमाधव जोशी

**<u>प्रास्ताविक</u>:**

ग्रीक महाकवी होमर याच्या मुखातून बाहेर पडलेली दोन महाकाव्ये Iliad व Odyssey सर्व महाकाव्यांची जननी मानली जातात. ट्रोजन युद्ध या घटनेतील काही भाग इलियड या महाकाव्यामधे वापरला आहे. होमरच्या वेळी छापण्याचीच काय पण लिहिण्याची कला व साहित्य (कागद, लेखणी, वगैरे) विकसित झालेले नसल्यामुळे ही दोन्ही महाकाव्ये त्याने श्रोत्यांच्या समोर गाऊन निर्माण केली व लोकांनी ती मुखोद्‌गत करून तोंडी वारशाने पिढ्यान पिढ्या पुढे नेली. इ. सन पहिले शतक ते बारावे शतक या काळात (Dark Ages) ती पूर्ण अज्ञात, अंधारात राहिली. १२व्या शतकातील इस्तंबुलचा पाडाव (Fall of Constantinople) व साहित्याचे पुनरुत्थान (Renaissance) या दोन घटनांनी ती परत उजेडात आली आणि नंतरच त्यांचे अस्तित्व त्यांच्या इंग्लीश भाषांतराने जगासमोर आले. दोही महाकाव्यांना Heroic Epic म्हणजे नायकाचे कर्तृत्व वर्णन करणारी अभिजात महाकाव्ये मानली जातात.

इलियडचे कथानक वाचताना ट्रोजन युद्धाची कथा चांगली लक्षात ठेवावी. ग्रीक भाषेतून इंग्लीश भाषेत रूपांतरित होताना काही नावांत बदल झाला आहे. ट्रॉयचे मूळ नाव ’इलियम’; त्यावरून ’इलियड’. युलिसेसचे मूळ नाव ’ओडेसियस’; त्यावरून ’ओडेसी’. ’झ्यूस’ (देवेन्द्र) चे इंग्लिश रूपांतर ’ज्युपिटर’. ’पोझिडॉन’ (समुद्र देव) - God of the Underworld चे रूपांतर ’नेपच्यून’. ’ॲफ्रोडाइट’ (सौंदर्यदेवता) चे रूपांतर ’व्हीनस’.

**<u>प्रमुख पात्रे</u>:**

| | |
|---|---|
| ॲकिलीस - | महापराक्रमी ग्रीक योद्धा; झ्यूस या देवेन्द्राला थेटीस या देवतेपासून झालेला मुलगा; महाकाव्याचा नायक |
| प्रायम - | ट्रॉयचा सम्राट |
| हेक्टर - | प्रायमचा ज्येष्ठ मुलगा; पराक्रमी, स्वाभिमानी, ट्रोजन महावीर, दूरदर्शी |
| पॅरिस - | प्रायमचा दुसरा मुलगा; हेलनचा प्रियकर |
| ॲगामेम्नन - | ग्रीक सम्राट; प्रमुख सेनानी |
| मेनीलॉस - | स्पार्टाचा राजा, ॲगामेम्ननचा धाकटा भाऊ; हेलनचा पती |
| युलिसेस - | ’इथाका’ बेटाचा राजा; ग्रीक सैन्यातील हुशार, पराक्रमी सेनानी |
| हेलन - | मेनीलॉसची पत्नी; पॅरिसबरोबर पळून आलेली |
| पॅट्रोक्लीस - | ॲकिलीसचा पराक्रमी मित्र |
| झ्यूस (ज्यूपीटर) - | देवांचा अधिपती |
| अथीना - | युद्ध देवता |
| ॲफ्रोडाइट (व्हीनस) - | सौंदर्यदेवता |

**कथानक:**
ट्रोजन युद्ध सुरू होऊन दहावे वर्ष लागलेले असते. इलियड इथे सुरू होते. ग्रीक सैन्याचा सेनानी ॲगामेम्नन याने आपले सहकारी सेनानी व प्रचंड सेनासागर यांना घेऊन ट्रॉय शहराला वेढा दिलेला असतो. रोज सकाळी सूर्योदय होताच ट्रोजन सैन्य तटबंदीच्या बाहेर येऊन ग्रीक सैन्यावर हल्ला चढवून वेढा उठवण्याचा प्रयत्न करते पण अजून त्यांना यश आलेले नाही. संध्याकाळ होताच हे सैन्य परत शहरात आश्रयाला येते. युद्धाचे नियम आपल्याकडील महाभारतीय युद्धासारखेच आहेत; रात्री युद्ध नाही.

हेक्टरच्या नेतृत्वाखाली ट्रोजन सैन्य घनघोर संग्राम करते आहे. ग्रीक सैन्याचा महान योद्धा ॲकिलीस पराक्रमाची शर्थ करून शेकडो ट्रोजन वीरांना कंठस्नान घालतो आहे. पण अजून विजयाचे पारडे कोणाच्याच बाजूला झुकलेले नाही. देवांच्या हस्तक्षेपामुळे कधी ट्रोजन पक्ष मात करतो तर कधी ग्रीक पक्ष.

दहावा दिवस उजाडतो आणि एका छोट्या मतभेदामुळे ॲकिलीस रूसून युद्धात भाग घेण्यास नकार देतो. आपल्या छावणीत तो बसून राहतो. आधीच्या एका चकमकीत विजयाच्या लुटीत ॲकिलीसच्या वाट्याला ब्रिसीज नावाची एक सुंदर तरूणी आलेली असते. ॲगामेम्नन तिची मागणी करून बळजबरीने तिला आपल्या परिवारात घेतो. त्यामुळे रूसलेला ॲकिलीस युद्धातून अंग काढून घेतो. झ्यूस या आपल्या देवपित्याला याबद्दल ॲगामेम्ननचा सूड घेण्याची विनंती करतो. झ्यूस ॲगामेम्ननला एका स्वप्नाद्वारे आपल्या सैन्याची फेर जुळवणी करून ट्रॉयवर हल्ला करण्यास सांगतो. त्याचवेळी ॲकिलीसचा रूसवा कळल्यामुळे हेक्टर अधिक आक्रमक बनतो.

आपल्या सैन्याला एकत्र करून ॲगामेम्नन सकाळी ट्रॉयच्या तटबंदीच्या दिशेने कूच करतो. बऱ्याच दिवसांनी हा हल्ला होत असल्याने ट्रोजन्सही आपल्या सर्व तयारीनिशी शहराच्या संरक्षक भिंतीबाहेर येऊन आक्रमणाला तोंड द्यायला सिद्ध होतात. त्यावेळी एक अनपेक्षित घटना घडते. भिंतीच्या एका गॅलरीमध्ये पॅरिस येऊन उभा राहतो व मेनीलॉसला युद्धाचे आव्हान देतो; 'जो जिंकेल त्याची हेलन व दोन्ही सैन्यांनी हा निर्णय मानून युद्ध व रक्तपात थांबवावा.' दोन्हीकडचे सेनापती हा प्रस्ताव मान्य करतात. हेलनही हे द्वंद्व युद्ध पाहण्यासाठी गॅलरीमध्ये येऊन उभी राहते.

दोघांची झटापट सुरू होते. मेनीलॉस पॅरिसपेक्षा सामर्थ्यवान व प्रबळ योद्धा असतो. मेनीलॉस आपला भाला पॅरिसच्या छातीत खुपसणार एवढ्यात पॅरिसची संरक्षक देवता व्हीनस आकाशातून खाली येते व पॅरिसला झपकन उचलून ट्रॉयच्या आत घेऊन जाते. यामुळे मेनीलॉसला विजयी घोषित केले जाते.

स्वर्गामध्ये या एकतर्फी निर्णयाविरूद्ध ट्रॉयचे पक्षपाती देव निषेध व्यक्त करतात. अथीना पृथ्वीवर येऊन पॅंडॅरस या ट्रोजन योद्ध्यास मेनिलॉसला ठार मारण्याची सूचना करते. पॅंडॅरसने मारलेला बाण

मेनीलॉसच्या रक्षणकर्त्या देवतेकडून चुकवला जातो व मेनीलॉस नुसता जखमी होतो. पँडॅरसच्या या विश्वासघातकी कृत्यामुळे ऍगामेम्नन चिडतो; तहाचा भंग होतो व परत युद्ध सुरू होते. दोन्हीकडील अनेक सैनिक त्या दिवशी मारले जातात.

ट्रोजन सेनापती हेक्टर दुसरे दिवशी स्वतःच ग्रीक सैन्यावर आक्रमण करायचे ठरवतो. पॅरिसची तो पळपुटेपणाबद्दल निर्भत्सना करतो व दोघेही आक्रमण करण्यासाठी बाहेर पडतात.

जिंकू अथवा मरू या निश्चयाने बाहेर पडणाऱ्या हेक्टरच्या मनात आपण जिवंत परत येऊ याबद्दल साशंकता असते. तो पत्नी एँड्रोमॅक हिचा व मुलाचा भावपूर्ण निरोप घेतो; त्याच्या बाहेर पडण्यात निरोपाची एक करूण छटा असते. होमरने ती अतिशय सुंदर व्यक्त केली आहे. दरम्यान या युद्धात दखल केल्यामुळे युद्ध परत सुरू होते याबद्दल देवाधिदेव झ्यूस नाराज झालेला असतो व तो सर्व देवतांना युद्धात भाग घेण्याची बंदी करतो.

दुसऱ्या दिवशी हेक्टर घनघोर युद्ध करून ग्रीक सैन्यात घुसून शेकडो सैनिकांना ठार करतो व आपल्या पराक्रमाने ग्रीक सेनापतीला भयभीत करतो. ऍकिलीसचे मन वळवण्याची नितांत गरज ऍगामेम्ननला जाणवू लागते. तो युलिसेसला ऍकिलीसचे मन वळवण्यासाठी काही भेटी देऊन पाठवतो. पण ऍकिलीस मध्यस्थी नाकारतो व ब्रिसीजला परत केले नाही तर दुसऱ्या दिवशी सकाळीच रणांगण सोडुन जाण्याची धमकी देतो.

दुसऱ्या दिवशी परत हेक्टर पराक्रमाची शर्थ करून ग्रीक छावण्यामध्ये घुसतो, युलिसेस जखमी होतो, शेकडो ग्रीक योद्धे मारले जातात; ग्रीकांचा पराभव अटळ दिसतो. हेक्टर किनाऱ्यावर नांगरून ठेवलेल्या ग्रीक जहाजांवर आक्रमण करण्यासाठी पुढे रेटा देतो. ऍकिलीस नसल्याने हेक्टरला आडवू शकेल असा कोणीही योद्धा ग्रीक सैन्यात दिसत नाही. परिस्थिती हातघाईवर येते. नेस्टर नावाचा वृद्ध अनुभवी ग्रीक सेनापती पॅट्रोक्लस नावाच्या ऍकिलीसच्या जिवलग मित्रामार्फत ऍकिलीसला निरोप पाठवतो की त्याने आपला राग सोडावा व आपल्या ग्रीक मित्रांना मदत करावी.

दरम्यान ग्रीकांच्या बाजूने युद्धात भाग घेणाऱ्या देवता संगनमत करून झ्यूसला झोपेचे औषध देतात व ऍगामेम्ननला स्वप्नाद्वारे प्रेरणा देऊन हेक्टरला एकटा गाठून हेक्टरवर हल्ला चढवतात. हेक्टर जबर जखमी होतो. त्याचे संरक्षक चपळाई करून त्यांच्या ढालींनी त्याचा देह झाकतात व त्याला सुरक्षित परत नेतात. रात्र होते आणि त्या दिवशीचे युद्ध थांबते.

झ्यूस जागा होतो व इतर देवतांनी केलेला हस्तक्षेप बघून संतापतो. तो हेक्टरच्या जखमा बऱ्या करून त्याला शक्ती देतो व ग्रीकांच्या जहाजांना ट्रोजन सैन्याने आगी लावल्यानंतरच युद्धातून अंग काढून घ्यायचे ठरवतो. पॅट्रोक्लस ग्रीक सैन्याची ही पिछेहाट पाहून ऍकिलीसला विनंती करतो की त्याने आपले सुप्रसिद्ध चिलखत (armour) पॅट्रोक्लसला अंगावर चढवून युद्धात त्याच्याऐवजी भाग घेण्याची परवानगी द्यावी. ऍकिलीस तशी परवानगी देतो.

दुसरे दिवशी ऍकिलीसचे चिलखत पाहून ग्रीकांना हुरूप येतो व ते आक्रमण करत ट्रॉयच्या तटबंदीपर्यंत पोचतात पण हेक्टरशी झालेल्या लढाईत पॅट्रोक्लस प्राणांतिक जखमी होतो. हेक्टर त्याच्या अंगावरील ऍकिलीसचे दैवी चिलखत काढून घेतो. दिवसभर युद्ध केल्यानंतर पॅट्रोक्लसचा मृत देह ग्रीकांच्या ताब्यात येतो. पॅट्रोक्लसच्या मृत्यूने ऍकिलीस खवळून उठतो. आपली आई थेटीस या देवतेकडून तो रातोरात नवीन चिलखत बनवून घेतो व दुसरे दिवशी युद्धात उतरतो. ऍकिलीसच्या आगमनाने युद्धाचे पारडे पालटते. मित्राच्या मृत्यूचा सूड घेण्याच्या अनावर संतापाने ऍकिलीस अनेक ट्रोजन सैनिकांचा निःपात करीत हेक्टरला गाठतो. घनघोर संग्रामानंतर हेक्टर मारला जातो. ऍकिलीस त्याचा मृत देह रथाला बांधून फरफटत छावणीमध्ये आणतो.

हेक्टरच्या मृत्यूने ट्रोजन कॅंपवर अवकळा पसरते. सगळे शोकाकूल होतात. स्वतः हेक्टरचा पिता राजा प्रायम हेक्टरचा देह अंत्यविधीसाठी मागण्यासाठी ऍकिलीसच्या छावणीमधे येतो. देवसुद्धा त्याच्या बाजूने ऍकिलीसची मनधरणी करतात व आपला राग आवरून हेक्टरचा देह प्रायमच्या हवाली करण्याची विनंती करतात. विरघळलेला ऍकिलीस पुढे होऊन प्रायमचे स्वागत करतो व त्याची विनंती मान्य करतो व हेक्टरचा देह त्याच्या स्वाधीन करतो.

उभयतांच्या संमतीने ऍगामेम्नन १२ दिवसांचा शस्त्रसंधी तह जाहीर करतो. दोन्ही बाजू आपापल्या मृत वीरांसाठी शोक व्यक्त करतात व त्यांचे अंत्यविधी पूर्ण करतात. 'इलियड' महाकाव्य इथे संपते.

'इलियड'मध्ये देवतांनी सक्रीय भाग घेतलेला आहे. काही देव ट्रोजनांच्या बाजूने तर काही ग्रीकांच्या बाजूने. तेही माणसासारखे पक्षपात, मत्सर, राग, द्वेष अशा मानवी गुणदोषांनी युक्त आहेत; त्यामुळे युद्धाचे पारडे कधी इकडे तर कधी तिकडे असे झुकत राहते.

ooooo-----ooooo

आपल्या प्रतिक्रिया/सूचना कळवाः
Phone: 25881194
Email: joshi.bindumadhav@gmail.com